मावळ

# सुमन रमेश तुलसियानी टेक्निकल कॅम्पस, कामशेत येथे प्रथम वर्ष अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन कार्यक्रम

२०२५-०९-१७ | ०७:३७:०२ कामशेत



**कामशेत** : सुमन रमेश तुलसियानी टेक्निकल कॅम्पस अभियांत्रिकी महाविद्यालय, कामशेत येथे प्रथम वर्ष अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठीचा इंडक्शन कार्यक्रम २०२५ मोठ्या उत्साहात पार पडला. नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन परिसर, शैक्षणिक वातावरण तसेच संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती करून देणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. आर. जी. बिरादार (PCU) उपस्थित होते. आपल्या प्रेरणादायी भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना शिस्त, नवोपक्रम व सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य प्रा. (डॉ.) जे. बी. संकपाळ यांनी भूषविले. आपल्या भाषणात त्यांनी मूल्याधिष्ठित शिक्षण, व्यावसायिक प्रामाणिकपणा तसेच शैक्षणिक कार्यासोबतच इतर उपक्रमांत सक्रिय सहभागाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रम नव्हे तर शिकण्याची नवी दृष्टी, प्रश्न विचारण्याची सवय, नवकल्पनांची प्रेरणा आणि संघभावनेचे बळ मिळेल, असे सांगितले.

या कार्यक्रमाला सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व कर्मचारीवर्ग उपस्थित होते. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचा परिचय, विभागांची माहिती तसेच प्राध्यापकांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाचा पहिला दिवस उत्साहवर्धक व संस्मरणीय ठरला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वेदिका यादव आणि तुषार पवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. गौरव भोसेकर यांनी मानले.